महापारेषण
महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनी मर्यादित
(CIN NO-U40109MH2005SGC153646)
(GST NO-27AAECM2936N1Z2)

# ITI (Electrician) उमेदवारांसाठी सूचना

ITI (Electrician) उत्तीर्ण उमेदवारांना याद्वारे सुचित करण्यात येते की, म.रा. विद्युत पारेषण कंपनी मर्यादित, अउदा संवसु विभाग, धुळे कार्यालयामार्फत सन २०२१ ते २०२२ या कालावधीसाठी शिकाऊ (Apprentice) उमेदवारांना एक वर्षाच्या प्रशिक्षणासाठी खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन करारबध्द करण्यात येणार आहे.

१) **एकूण पदांची संख्या :** ३४

२) **शैक्षणिक पात्रता :** इयत्ता १० वी उत्तीर्ण गुणपत्रक व मान्यताप्राप्त औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा दोन वर्षाचा आय.टी.आय. इलेक्ट्रीशिअन (वीजतंत्री) उत्तीर्ण केल्याचे सर्व सेमीस्टरचे एकत्रित गुणपत्रक अपलोड करणे आवश्यक आहे.

३) **कामाचे ठिकाण :** धुळे, नंदुरबार जिल्हयात २२० के व्ही / १३२ के व्ही उपकेंद्रात कोठेही आणि जळगांव जिल्हयात ता. चाळीसगांव येथे २२० के व्ही / १३२ के व्ही उपकेंद्रात कोठेही.

४) **वयोमर्यादा :** वर्ष १८ ते ३० (मागासवर्गीयांसाठी ५ वर्ष शिथिलक्षम)

५) सदर अर्ज फक्त धुळे, नंदुरबार जिल्यातील व जळगांव जिल्यातील चाळीसगांव तालुकातील उमेदवारांना अर्ज करता येईल.

६) प्रशिक्षण कालावधी कंपनीच्या नियमाप्रमाणे विद्यावेतन अदा करणेत येईल.

७) अर्जदाराने महाराष्ट्र शासनाच्या www.apprenticeshipindia.org. या वेबसाईटवर नोंदणी करणे बंधनकारक असून दि.०१.०७.२०२१ ते ०५.०७.२०२१ कालावधीत https://apprenticeshipindia.org/apprenticeship - /opportunity या लिंकवरुन (Establishment Code – E06212700049) या आस्थापनेवर आवश्यक माहिती नमूद करुन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

८) अर्जदाराने अगोदर प्रक्षिणकालावधीत पुर्ण केलेले असेल किंवा चालु असेल अश्या उमेदवारांचे अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

वरील कागदपत्रे नमूद केलेल्या वेबसाईटवर अपलोड न केल्यास नोंदणी धारकांचा पुढील प्रकीयेसाठी विचार केला जाणार नाही. निवड झालेल्या उमेदवारांना ई- मेलद्वारे कळविणेत येईल. तरी कोणीही महापारेषण कार्यालयास भेट देवू नये. तसेच जाहिरातीमध्ये किंवा जाहिरातीच्या काही भागांमध्ये अंशत: बदल किंवा संपूर्ण जाहिरात रद्द करण्याचे अधिकार हे कंपनी राखून ठेवत आहे.

सदरच्या बाबतीत कुठल्याही प्रकारची तक्रार ऐकून घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

**टीप :** - आपले शैक्षणीक कागदपत्रे, ऑनलाईन रजिस्ट्रेशन अर्ज, एस.एस.सी. गुणपत्रक, बोर्ड प्रमाणपत्र, आय.टी.आय. इलेक्ट्रीशीयन गुणपत्रक (चारही सेमीस्टरचे एकत्रित गुणपत्रक), जातीचा दाखला, शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड एक छायांकीत प्रत स्वयंम स्वाक्षरी केलेली प्रत घेऊन कार्यकारी अभियंता, अउदा संवसु विभाग, १३२ के व्ही उपकेंद्र, वसाहत, मालेगांव रोड, धुळे ता.जि. धुळे – ४२४३११ येथे वरील नमूद केलेल्या कालावधीतच जमा करावे. सदरील कालावधीनंतर आलेले अर्ज ग्राहय धरले जाणार नाही.

कार्यकारी अभियंता
म.रा.वि.पारेषण कं. मर्यादित
अउदा संवसु विभाग, धुळे